## प्रेस नोट

### दिनांक ११/०६/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | श्री.गोपाल श्रीराम लोणारे वय ५० वर्ष पद– तलाठी, तलाठी कार्यालय, व–हा ता.तिवसा जि.अमरावती वर्ग – ३ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक ०८/०५/२०१९ अं. १२:३२ वा. ते दिनांक १४/०५/२०१९ चे १२:५५ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | ५,०००/–रु. |
| ५ | तडजोडअंती मागणी केलेली रक्कम | ४,०००/– रू. लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. |
| ६ | घटनास्थळ | तलाठी कार्यालय व–हा ता. तिवसा जि. अमरावती |

यातील तक्रारदार हे शेती करीत असुन त्यांनी दि.०२/०५/२०१९ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे चुलत आजोबांचे नावावर असलेली शेती त्यांचे वडीलांचे नावावर करण्याकरीता तलाठी कार्यालय व–हा येथील तलाठी श्री.लोणारे हे त्यांना ५०००/– रु. लाचेची मागणी करीत आहेत.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०८/०५/२०१९ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तलाठी श्री. लोणारे यांनी तक्रारदार यांचे चुलत आजोबांचे नावावर असलेली शेती तक्रारदार यांचे वडीलांचे नावावर करण्याकरीता ५०००/– रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४०००/– रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करून दि.१४/०५/२०१९ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान ४,०००/– रुपयाची लाच रक्कम घेवुन बोलावुन लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला परंतु संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. म्हणुन तलाठी श्री. लोणारे यांना आज दिनांक ११/०६/२०१९ रोजी ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रकिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती व श्री.गजानन पडघन, पोलीस उप अधिक्षक,अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरिक्षक रविंद्र जेधे, पो.शि.पंकज बोरसे, पो.शि.शैलेश कडू, पो.शि. महेंद्र साखरे व चालक सपोउपनि. सतिश किटुकले, यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**मोबाईल क. – ९४२०९३०५५५ ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५, २५५३०५५**
**टोल फ्रि नंबर –१०६४.**

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ★ अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ★ सत्यमेव जयते

(रविंद्र जेधे)
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned by CamScanner